
दै. सकाळ दि. 02.04.25

# सायबर गुन्ह्यांवर पोलिसांची कठोर कारवाई

## ऑनलाइन फसवणूक, बनावट स्कीम आणि मॉर्फिंग प्रकरणांवर विशेष लक्ष

**नांदेड, ता. १ :** सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी नांदेड सायबर पोलिसांनी कठोर पावले उचलली आहेत. गेल्या वर्षभरात १३२ आक्षेपार्ह पोस्टवर कारवाई करण्यात आली असून, बनावट स्कीम, ऑनलाईन लोन फसवणूक आणि मॉर्फिंग प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने नागरिकांनी विशेष सावधगिरी बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे.




ऑनलाईन लोन अ‍ॅप्सच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. झटपट कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून बँक खात्यांची गोपनीय माहिती घेण्याचे प्रकार समोर आले आहेत. अनेक वेळा या अ‍ॅप्सच्या माध्यमातून ग्राहकांचे वैयक्तिक डेटा चोरी करून त्यांना ब्लॅकमेल केले जाते. अशा अ‍ॅप्सचा वापर करण्यापूर्वी त्याची खात्री करावी आणि अधिकृत स्त्रोतांवरूनच माहिती घेण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.

### ऑनलाइन कर्ज पडेल महागात

झटपट कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून ऑनलाईन लोन अ‍ॅप्सच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अनेक बनावट अ‍ॅप्स आणि वेबसाईट्सद्वारे ग्राहकांची गोपनीय माहिती मिळवून आर्थिक लूट केली जात आहे. काही प्रकरणांमध्ये कर्ज घेतल्यानंतर मोठ्या व्याजदराने परतफेडीचा दबाव टाकला जातो, तर काही ठिकाणी कर्ज मंजूर होण्याआधीच विविध शुल्काच्या नावाखाली पैसे उकळले जातात. काही लोन अ‍ॅप्स ग्राहकांचे वैयक्तिक फोटो, कॉन्टॅक्ट्स आणि अन्य डेटा संग्रहित करून त्याचा गैरवापर करत आहेत. पैसे वेळेवर न भरल्यास संबंधित व्यक्तींचे फोटो मॉर्फिंगद्वारे आक्षेपार्ह स्वरूपात एडिट करून सोशल मीडियावर शेअर करण्याची धमकी दिली जाते. ब्लॅकमेलिंगमुळे अनेक नागरिक मानसिक त्रासाला सामोरे जात आहेत.

### मागील वर्षात २७ गुन्हे दाखल



सायबर गुन्ह्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेंतर्गत नांदेड पोलिसांनी २०१९ पासून २ कोटी ४८ लाख ९२ हजार रुपयांची रक्कम होल्ड केली असून, ७४ लाखांच्या मालमत्तेची परतफेड करण्यात आली आहे. सायबर गुन्ह्यांवरील कारवाईत यंदा सहा नवीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २०२४ मध्ये आयटी कायद्यांतर्गत २७ गुन्ह्यांची नोंद झाली असून, यापैकी २५ गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला आहे. ऑनलाईन फसवणुकीशी संबंधित १४ गुन्हे, बदनामी व मॉर्फिंग प्रकरणातील ११ गुन्हे, तर समाजात द्वेष पसरवण्याचे दोन गुन्हे यामध्ये समाविष्ट आहेत. तर मागील वर्षभरात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या १३२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

### फसवणुकीपासून सावध राहावे !

इंटरनेट आणि मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झाली असून, आर्थिक फसवणूक, ओळख चोरी, ऑनलाईन छळ, सायबर स्टॉकिंग, सेक्सटॉर्शन, डीपफेक, क्रेडिट कार्ड फ्रॉड, ऑनलाईन जॉब स्कॅम यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. सायबर सुरक्षेसाठी नागरिकांनी संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, अनोळखी अ‍ॅप्स डाऊनलोड करू नयेत, पासवर्ड नियमित बदलावा, टू-स्टेप ऑथेंटिकेशन वापरावे, सार्वजनिक वाय-फाय टाळावे, ओटीपी किंवा क्रेडिट कार्ड माहिती कोणाशीही शेअर करू नये अशा उपाययोजना कराव्यात. सायबर गुन्ह्याच्या तक्रारीसाठी १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन सायबर सेलचे पोलिस उपनिरीक्षक मारोती चव्हाण यांनी केले.